"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

**कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३**
**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL : nkgsbs@gmail.com**
**कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)**

।। वरं जनहितं ध्येयम् न केवलं जनस्तुतिः।।

मूल्य रु. ५

क्रमांक २ वर्ष : ३९ जुलै - सप्टेंबर २०१७

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## हळदीकुंकू समारंभ : भगिनींस निमंत्रण

नेहमीचा श्रावणातला हळदीकुंकू समारंभ यंदा जोगेश्वरी व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळात वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य उपस्थित राहावे.

**जोगेश्वरी**

**तारीख** : शुक्रवार १८ ऑगस्ट

**स्थळ** : रामेश्वर मंदीर
सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू)

**वेळ** : संध्याकाळी ५ ते ७

**संघ कार्यकारिणी तर्फे**

जयश्री भेडसगांवकर, शांता पालेकर

**मुलुंड**

शुक्रवार १८ ऑगस्ट

सौ.स्मिता वाघ यांच्या घरी, २०४ पूर्णिमा दर्शन,
फडके रोड, मुलुंड (पू.), कॉसमॉस बँकेवर

संध्याकाळी : ५ ते ७

**ठाणे मंच कार्यकारिणी तर्फे**

स्मिता वाघ मंजिरी कुलकर्णी

## जाहीर निमंत्रण

ठाणे व मुंबई मंच सादर करीत आहोत हिन्दी संगीताच्या सुवर्ण युगातील अवीट सुमधुर अशा चालीनी नटलेल्या अनोख्या गीतांचा नजराणा.

# गुजरा हुआ जमाना

(दृकश्राव्य - Audio Visual)

**स्थळ : तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम**
**दिनांक : रविवार १० सप्टेंबर २०१७**
**वेळ : संध्याकाळी ४.३० ते ७.३०**

**ठाणे - मुलुंडकरांसाठी विशेष सोय : मुलुंडहून ३ वाजता एक स्पेशल बस निघेल व ठाण्याहून ३.३० वाजता निघेल. कार्यक्रम संपल्यावर त्याच मार्गाने परत येईल.**

**इच्छुकांनी खालील व्यक्तींकडे संपर्क साधावा.**

| | | |
|---|---|---|
| सुरेश पालेकर | मंजिरी कुलकर्णी | राजू बोरकर |
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९८२०९१७८४१ |

**N.K.G.S.B. Industrial & Education Society**
**Centenary Loan Scholarship**

Education Society offers Centenary Loan Scholarship for higher studies in India and abroad. The society is happy to announce that from this year the interest rate on loan taken for education purpose has been reduced to 7% per annum. For other and conditions contact Society's office.

# संपादकीय

## एन्‌केजीएस्‌सबी बँकेची शताब्दी

### आपली एज्युकेशन सोसायटी व आपला संघ विद्यमान खातेदारांपैकी सर्वांत जुने

आपली एन्‌केजीएस्‌बी बँक २६ सप्टेंबर १९१७ रोजी स्थापन झाली होती. त्या अनुषंगाने २६ सप्टेंबर २०१६ ते २६ सप्टेंबर २०१७ हे वर्ष शताब्दी म्हणून साजरे होत आहे. वर्षभर मुंबई, पुणे, फोंडा, कारवार, कोल्हापूर, बंगळूर, हुबळी इत्यादी ठिकाणी विविध कार्यक्रम भरविण्यांत आले गेले.

आपली एज्युकेशन सोसायटी १९०४ साली स्थापन झाली होती. त्यानंतर तेरा वर्षांनी बँकेची स्थापना झाली. बँकेच्या आद्य संचालकापैकी तिघे, भालचंद्र सदाशिव वाघ, वैकुंठ रामचंद्र मुझुमदार व मंगेश जोगप्पा वागळे हे त्यावेळी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचेही सभासद होते. दोन्ही संस्थांच्या कार्यकारिणीवर एकाच वेळी काम करण्याची परंपरा पुढे बरीच वर्षे चालू होती. तात्पर्य बँक व एज्युकेशन सोसायटी हे गेल्या शंभर वर्षांचे सहप्रवासी आहेत.

आपल्या संघाची स्थापना १९३५ साली झाली तेव्हांपासून संघही बँकेचा सहप्रवासी आहे. एवढे की सुरुवातीपासून आतापर्यंत ८२ वर्षे उभयतांची कार्यालये एकाच वास्तूत आहेत. १९३६ ते ३८ दरम्यान संघाचे कार्यालय गिरगांवांत सावे हाऊसमध्ये होते व बँक संघाची पोटभाडेकरु होती. १९३९ साली उभयतांनी आपले बस्तान सोकाबाई बिल्डिंगमध्ये हलविले. १ नोव्हेम्बर १९३९ रोजी संघाने व्ही. पी. रोडवरील सायमन इस्टेट येथे भाडेतत्त्वावर जागा घेतली व बँक पुनश्च संघाचे पोटभाडेकरु म्हणून कार्य करु लागली. १९६७ साली बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या दरम्यान बँकेने सदर सायमन इस्टेट ही वास्तू लिलावात खरेदी केली व त्या वास्तूचे नामकरण 'लक्ष्मीसदन' असे करण्यात आले. तेव्हांपासून संघ बँकेचा भाडेकरु झाला ते अद्यापपर्यंत असा हा संघाचाही बँकेसमवेत सहप्रवास, एवढेच नव्हे तर सहनिवासी.

आपल्या एज्युकेशन सोसायटीचे बँकेच्या गिरगांव शाखेत बचत खाते क्र. ३२६ हे आहे. बँकेच्या विद्यमान सर्व खातेदारांमध्ये हे सर्वांत जुने खाते आहे. हे खाते सोसायटीतर्फे ४ मार्च १९३८ रोजी भिकप्पा विनायक तेलंग (कार्याध्यक्ष) व पद्मनाभ मंगेश वाघ (खजिनदार) यांच्या सह्यांनिशी उघडले होते. वास्तविक संघाचा बँकेशी व्यवहार दोन वर्षे अगोदरपासून आहे. १९३६ सालच्या संघाच्या पहिल्या वर्षाच्या अहवालांत बँकेतील मुदत ठेव व बचत खाते यांतील रकमेचा उल्लेख आहे. संघाचे खाते क्रमांक नंबर कालांतराने बदलले असण्याची शक्यता आहे पण संघाचे बँकेशी व्यवहार १९३६ पासून निश्चित.तात्पर्य एज्युकेशन सोसायटी व संघ बँकेच्या विद्यमान खातेदारापैकी सर्वात जुने आहेत.

बँकेतर्फे प्रतिवर्षी देणग्या, जाहिराती, प्रायोजकत्व, या स्वरुपात उभय संस्थांना आर्थिक साहाय्य मिळते. त्याबद्दल आम्ही बँकेचे ऋणी आहोत.

बँकेला व उभय संस्थांना उत्तरोत्तर नांदा सौख्यभरे अशी सदिच्छा.

द.ना.नाडकर्णी

## एज्युकेशन सोसायटी : गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षिसे

दरवर्षी ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे दिली जातात. त्यानुसार यंदाही १९ नोव्हेंबर २०१७ रोजी भरणाऱ्या स्नेहसंमेलनांत बक्षिसे दिली जातील. बक्षिसांची पात्रता पुढील प्रमाणे :

| **परीक्षा** | | **किमान पात्रता** |
|---|---|---|
| **दहावी** | | ८०% |
| **बारावी –** | **विज्ञान** (वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश घेतला असेल तर अर्जात तसे नमूद करावे.) | ७५% |
| | **वाणिज्य** | ७०% |
| | **कला** | ६५% |
| **पदवी व सरकारमान्य डिप्लोमा** | | ६०% |
| **एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी. पीएच.डी, वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एम.बी.ए., सी.ए., कॉस्ट अकौंटस, कंपनी सेक्रेटरी, पदव्युत्तर डिप्लोमा इत्यादी,** | | उत्तीर्ण |
| **परदेशांत घेतलेली पदवी** | | ए ग्रेड |

तसेच किमान राज्य पातळीवरील क्रीडास्पर्धेत ज्यांना पदके मिळाली असतील किंवा जे स्कॉलरशिप परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाले असतील तर संबंधितांनी त्याचाही तपशील पाठवावा. कार्यकारिणी अशाही अर्जांचा विचार करील.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख १ ऑक्टोबर २०१७**

विद्यार्थ्यांनी गुणवत्ता पत्रिकेची प्रत (झेरॉक्स), टेलीफोन नंबर, Email व संपूर्ण पत्ता.

The NKGSB Ind & Education Society, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai 400004. या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी.

- ☐ विद्यार्थ्याच्या वडिलांचे मूळ गांव उत्तर कानडांत असावे व ते स्मार्त कवळे मठानुयायी असावेत किंवा आई माहेरच्या तिथल्या असून सारस्वत पोटजातीतील गृहस्थाशी विवाहबद्ध असल्या पाहिजेत.
- ☐ बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस., जर्नेलिझम किंवा बी.कॉम. शाखेत प्रवेश घेतल्यास तसे नमूद करावे.
- ☐ ज्या डॉक्टर्सनी एम्.एस्. किंवा एम्.डी. साठी प्रवेश घेतला आहे, त्यांनाही काही पुरस्कृत बक्षिसे आहेत. संबंधितांनी याचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावा.

# प्रकाशझोत

## डॉ. अरुण नेत्रावळी यांना प्रतिष्ठेचा मार्कोनी पुरस्कार

मार्कोनी हे एक इटालियन शोधक व रेडीओचे जनक. त्यांना नोबेल प्राईज मिळाले होते यावरुनच त्यांच्या संशोधनाचा उच्च दर्जा लक्षात येतो. त्यांच्या मुलीने वडिलांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्थापलेल्या मार्कोनी सोसायटीतर्फे रेडीओ आणि व्हिडीओ संशोधनांत असामान्य योगदान देणाऱ्या संशोधकांना प्रतिवर्षी अत्यंत प्रतिष्ठित समजला जाणारा मार्कोनी पुरस्कार देण्यांत येतो. यंदा हा पुरस्कार डॉ अरुण नेत्रावळी यांना त्यांच्या डिजीटल व्हिडीओ या क्षेत्रातील संशोधनाबद्दल मिळाला आहे. डॉ. नेत्रावळी यांचे दृकश्राव्य विषयांत एवढें गहन संशोधन आहे की त्यांना आतापर्यंत अनेक मानाचे पुरस्कार मिळालेले आहेत मागे २००१ साली नॅशनल मेडल ऑफ टेक्नॉलॉजी हे अमेरिकेतील विज्ञान शाखेतील सर्वोच्च पदक त्यांना प्रदान करण्यांत आले होते. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. संघानेही त्यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतलेले आहे.

## डॉ. नीता वर्टी यांनी घडविला इतिहास

अलीकडेच पुण्याच्या एका हॉस्पिटलमध्ये दोन मुलीवर गर्भाशयाचे यशस्वीप्रमाणे प्रत्यारोपण करण्यात आले. या मुलींना जन्मत:च गर्भाशय नव्हते किंवा अविकसीत होते. आता त्या मुली सामान्य जीवन कंठू लागल्या आहेत व त्यांची मासिक पाळीही सुरु होईल. या शस्त्रक्रियेत डॉ. नीता राजीव वर्टी या प्रसूतीतज्ज्ञ डॉक्टरांचा महत्वाचा सहभाग होता. भारतातील अशा प्रकारची पहिलीच शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने डॉ. वर्टी प्रफुल्लीत आहेत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी इतिहासच घडविला आहे.

डॉ. वर्टी या गर्भाशयाचा टयुमर व कॅन्सर यावर लॅप्रोस्कॉपीच्या पध्दतीने शस्त्रक्रिया करण्यांत फारच वाकबगार आहेत. या पध्दतीत शरीराचा संबंधित भाग कापावा लागत नाही. शरीरांत एकदोन ठिकाणी छिद्रे करुन त्यांतून सूक्ष्म दुर्बीणींच्या साहाय्याने पीडीत भाग अचूक शोधून काढला जातो. व तेवढयाच भागावर मारा करुन आवश्यक तेवढा भाग काढता येतो. काही वर्षापूर्वी त्यांनी एका साहाय्यक डॉक्टरासमवेत एका पस्तीस वर्षे वयाच्या महिलेच्या उदरातून पाच तास शस्त्रक्रिया करुन ३ ते ४ किलो एवढया विक्रमी प्रचंड वजनाचा गोळा लॅप्रोस्कोपीच्या पध्दतीने यशस्वीपणे बाहेर काढला. सामान्यत: अशा प्रकारच्या गोळयांचे वजन शंभर ग्रामहून कमी असते. या अप्रुप शस्त्रक्रियेसंबंधी अमेरिकेतील एका नियतकालिकेत लेख छापून आला होता. त्याची दखल घेऊन 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस' या संस्थेने या विक्रमाची नोंद घेतली.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार : सुनील सुकथनकर व अतुल कसबेकर यांचे कौतुकास्पद यश

६ एप्रिल २०१७ रोजी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जाहीर करण्यांत आले. त्यांत आपल्यापैकी सुनील सुकथनकर व अतुल कसबेकर यांनी कौतुकास्पद यश मिळविले. सुनील हा गेल्या पिढीतील कारवार येथील प्रतिष्ठित नागरीक श्री. महेश मुझुमदार (महेश मास्तर) यांचा पणतू. वर नमूद

केलेल्या चित्रपट पुरस्कारामध्ये 'कासव' या मराठी चित्रपटाला अखिल भारतीय स्तरावरील सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे 'सुवर्णकमल' हा पुरस्कार मिळाला. या चित्रपटाचे दिग्दर्शन सुनील याने सुमित्रा भावे यांच्यासह केले होते. सध्याच्या तरुणाईमध्यें मूल्यांचा गोंधळ झाला आहे. त्याग का उपभोग, विज्ञान का अध्यात्म, चंगळवाद का सामाजिक भान यात त्यांच्यात संभ्रम निर्माण झाला आहे. नैराश्येने ग्रासलेल्या तरुणांना आपले असें कुणीच वाटत नाही. त्यांतही जीवघेणी स्पर्धा. नैराश्य दूर करण्यासाठी ते अंमली पदार्थाच्या आहारी जातात व आत्महत्येचाही विचार करतात. नैराश्येच्या गर्तेतून तरुणांना कसे बाहेर काढायचे या सामाजिक विषयावर 'कासव' हा चित्रपट आधारलेला आहे.

मागे मुखपत्रिकेच्या अंकांत 'नीरजा' या अत्यंत गाजलेल्या चित्रपटासंबंधी माहिती दिली होती. आपल्या संघाचे हितचिंतक श्री. अरुण व सौ. मंगला (प्रभा) कसबेकर यांचा सुप्रसिध्द छायाचित्रकार अतुल कसबेकर हा सुपुत्र. 'निरजा' या चित्रपटाची निर्मिती अतुल याचीच होती. शासनाने हा चित्रपट करमुक्त केला हीच अतुलच्या कर्तृत्वाची उचित पावती. राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'नीरजा' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट हा पुरस्कार मिळाला आहे.

समस्त कारवारकरांतर्फे सुनील व अतुल यांचे हार्दिक अभिनंदन.

## 'मित्रा कोण होती ?' श्री दुर्गानंद गायतोंडे यांचे आणखी एक पुस्तक प्रकाशित

पुण्याचे ९८ वर्षाचे श्री. दुर्गानंद वामन गायतोंडे म्हणजे एक चिरतरुण चैतन्यमूर्ती. त्यांचे शिक्षण कराची व मुंबई येथे झाले आहे. व्यवसायानिमित्त त्यांनी अनेक देशी व परदेशी उद्योगसमुहांत वरच्या हुद्यावर नोकरी केली आहे. संचालकांपासून पट्टेवाल्यापर्यंत व पंचतारांकित होटेलपासून कर्मचाऱ्यांच्या वस्तीपर्यंत त्यांचा दांडगा संपर्क असे. तसेच नोकरीनिमित्त भारतभर वास्तव्य केल्यामुळे देशभरच्या निरनिराळया चालीरीती, संस्कृती, विचारसरणी यांचे त्यांना जवळून दर्शन झाले आहे. त्यामुळे त्यांच्या विचाराच्या क्षितीजाच्या कक्षा बऱ्याच उंचीवरच्या आहेत. उच्चभ्रू समाजात राहूनसुध्दा योगाभ्यास, गीताभ्यास, अध्यात्म इत्यादी गहन विषयांत त्यांचे संशोधन सुरुच असते. व्यवसायाच्या निगडीत देशांतील अनेक कंपनीत त्यांनी व्यवस्थापनाच्या कार्यशाळा घेतलेल्या आहेत व पुस्तकेही लिहिली आहेत. समाजकार्य, गरजू विद्यार्थ्यांना शिकवण, आर्थिक साहाय्य, गायत्रीमंत्राचा प्रसार यांतही त्यांचे योगदान आहे. २०१५ साली ऋषीपंचमीच्या शुभमुहुर्तावर राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता.

वयाची नव्वदी ओलांडल्यावर त्यांनी मराठी व इंग्रजीत कथासंग्रह, चारित्रलेख, विनोद, अध्यात्म या विषयांवर डझनहून अधिक पुस्तके प्रकाशित केली आहेत. त्यांच्या अष्टपैलू व बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची छाप त्यांच्या लेखनांत दिसून येते. अलीकडे श्री. गायतोंडे यांची 'मित्र कोण होती ?' ही रहस्यमय लघुकादंबरी प्रकाशित झाली आहे. एका सुखवस्तु कुटुंबात अचानक आलेल्या वावटळी संदर्भात लिहिलेली ही एक उत्कंठावर्धक दीर्घकहाणी आहे.

('मित्रा कोण होती ?' मूल्य रु. १०० प्रकाशक : उत्कर्ष पुणे ०२०-२५५३७९५८)

## कु. कुणाल पिकळे याचे अमेरिकेत असामान्य यश

मुलुंड येथे राहणारे सौ. वंदना व श्री. रत्नाकर रामराव पिकळे यांचा आय. टी इंजीनिअर सुपुत्र विराज हा हुस्टन, टेक्सास येथे स्थायिक झाला आहे. विराज व प्रीती पिकळे यांचा दहा वर्षाचा मुलगा कुणाल याने तेथील प्रख्यात नॉर्थ साऊथ फांऊडेशनतर्फे घेतलेल्या सायन्स बी ज्युनीयर गट स्पर्धेत शेकडो विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याला संगीताचीही अतिशय आवड आहे. गेली पाच वर्षे तो पियानो वादनाचे प्रशिक्षण घेतो व शाळेतर्फे घेतलेल्या स्पर्धेत भाग घेतो.

कुणालच्या असामान्य यशाबद्दल त्याचे मन:पूर्वक अभिनंदन.

## श्रीमती वीणा पालेकर मोये यांच्या दोन कथासंग्रहाचे प्रकाशन

पारले येथे राहणाऱ्या श्रीमती वीणा मोये या महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतून निवृत्त झालेल्या मुख्याध्यापिका, पूर्वाश्रमीच्या बाडनिवासी वीणा सखाराम पालेकर. निवृत्तीनंतर व पतीनिधनानंतर त्यांनी लेखनकार्यास वाहून घेतले. आतापर्यंत त्यांची दहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अलीकडची दोन पुस्तके म्हणजे 'गप्पागोष्टी' व 'एफ.आय.आर २' या दोनही पुस्तकांचे प्रकाशन १४ मे रोजी एका कौटुंबीक सोहळयात चार वयस्कर व्यक्तींच्या हस्ते झाले. त्यांतील एक म्हणजे वीणाताईंचे वडील बंधू समाजसेवक विनायक सखाराम पालेकर व दुसरे होते मुखपत्रिकेचे संपादक श्री. द. ना. नाडकर्णी.

'गप्पागोष्टी' हे पुस्तक लहान मुलांसाठी लिहिलेले आहे. वीणाताई या स्वत: प्राथमिक शाळेतील शिक्षिका असल्याने सुबोध व साधी भाषा लिहिण्यांत त्यांची हातोटी दिसून येते. हे पुस्तक लहानासाठी असले तरी त्यांतील आशय थोरांसाठीही उपयुक्त आहे. त्यांत रामायण, महाभारत, तेनालीराम या वाङ्मयांतील काही सुरस कथा आहेत.

'एफ. आय. आर २' हा कथासंग्रह पोलीसकथा आवडीने वाचणाऱ्या वाचकांसाठी एक पर्वणीच आहे. उत्कंठावर्धक कथांचा हा एक उत्कृष्ट संग्रह आहे. या संग्रहातील कथा व वीणाताईने अशाच प्रकारच्या लिहिलेल्या दुसऱ्या एका संग्रहातील कथा या सीरीयल काढण्याच्या लायकीच्या आहेत. 'दक्षता' या पोलीस मासिकानेंसुध्दा या पुस्तकाची दखल घेऊन या पुस्तकाची प्रशंसा केली आहे.

(वीणा मोये, पारले, संपर्क : ८४५४८१२११०)

## 'The Truth, the whole Truth and Nothing but the Truth, so help me God'
## कु. मनीषा वाघ यांची पहिली कादंबरी प्रकाशित.

ठाणे येथे राहणाऱ्या कु. मनीषा मोहन वाघ या एक मोठया कायदेतज्ज्ञ आहेत. त्यांनी अलीकडेच वर नमूद केलेली त्यांची पहिली कादंबरी प्रकाशित केली आहे. या पुस्तकांत 'तारा मोरे' या होतकरू, महत्त्वकांक्षी, हुशार, तरूण महिला वकीलाच्या वयवसायातील चढउतार, यश-अपयश, हेवे दावे, वरीष्ठांशी व सहकाऱ्यांशी आलेले अनेक गुंतागुंतीचे नाजूक प्रसंग, पाताळयत्री व्यक्तींबरोबर खटके, सुस्त यंत्रणेशी मुकाबला, या संदर्भात एका उत्कंठावर्धक आयुष्याचे प्रवासवर्णन आहे. हे

पुस्तक  Zorba Books या प्रकाशन संस्थेकडे कागदी स्वरुपांत उपलब्ध आहे. तसेच Amazon, Flipcart, snapdeal, paytm इत्यादी शॉपिंग साईट्सवर on line उपलब्ध आहे.
संपर्क : manimwagh@gmail.com

**डॉ. सुहास वाघ यांना ई. एन्. टी. डॉक्टर्स असोसिएशनतर्फे जीवनगौरव पुरस्कार**

माहीम येथे राहणारे डॉ. सुहास पांडुरंग वाघ मुंबईतील ई. एन्. टी. क्षेत्रातील एक नामांकित कन्सल्टींग सर्जन. २०१४ साली त्यांना ज्ञातीच्या स्नेहसंमेलनांत प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. तेव्हां मुखपत्रिकेच्या अंकांत त्यांच्या कर्तृत्वाची ओळख करुन दिली होती. अलीकडेच इ. एन्. टी. सर्जन्स ऑफ इंडिया या संस्थेच्या मुंबई शाखेतर्फे २०१७ चा 'जीवन गौरव' पुरस्कार त्यांना प्रदान करण्यांत आला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

**डॉ. महेश संजगिरी यांची आकाशवाणी मुंबई,**
**कोंकणीविभागातर्फे कार्यक्रम सादर करण्याची पन्नासवर्षे**
**पणजी दूरदर्शनकेंद्रावर खास मुलाखत**

निसर्ग व पर्यावरण यातील तज्ज्ञ पारल्याचे डॉ. महेश नारायण संजगिरी यांनी आकाशवाणीच्या संदर्भात एक विक्रम केला आहे. १९६७ साली वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी त्यांनी आकाशवाणी मुंबईवर पहिला कोंकणी कार्यक्रम सादर केला. त्याला आता बरोबर पन्नास वर्षे उलटली. ते सतत लहान मुलांसाठी कोंकणी नाटिका, संवाद, मुलाखती, निसर्गविषयक मनोरंजक माहिती अशा प्रकारचे कार्यक्रम सादर करीत असतात व स्वत:ही भाग घेतात. त्यांचे आतापर्यंत एक हजाराहून अधिक कार्यक्रम झाले आहेत. आकाशवाणीवर एका व्यक्तीचे एवढे कार्यक्रम झालेले नाहीत. त्यांचा 'भुरग्यांलॉ बोवाळ' हा कार्यक्रम फारच लोकप्रिय झाला होता. मुंबई दूरदर्शनतर्फे कोंकणीत प्रक्षेपण होत नसल्याने मुंबई आकाशवाणीच्या शिफारशीनुसार डॉ. संजगिरींची २८ एप्रिल २०१७ रोजी पणजी केंद्रातर्फे खास कोंकणीतून मुलाखत घेण्यांत आली.

डॉ. संजगिरीच्या सुविद्य पत्नी सौ. मंजुषा यांना विवाहापूर्वी कोंकणी बोलता येत नव्हते. त्यासुध्दा कोंकणी आत्मसात करुन पती समवेत कोंकणी कार्यक्रमांत भाग घेत आहेत. आकाशवाणी पणजीचे संचालक वेणू माधव बोरकर यांनी मंजुषाची घेतलेली मुलाखत २८ एप्रिल रोजी पणजी दूरदर्शन केन्द्रावरुन प्रसारित करण्यात आली होती. दूरदर्शन पणजी या संकेतस्थळावर यू टयूबवरुन ही मुलाखत बघता येईल.

मंजुषाने बसविलेला आपली कन्या कु. तन्वी हिचा भरत नाटयम्चा कार्यक्रमही १२ एप्रिल रोजी पणजी केन्द्रावरुन प्रसारित करण्यात आला तोही यू टयूब वरुन बघता येईल.

संजगिरी कुटुंबीयांचे अभिनंदन.

## विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा संघातर्फे सत्कार

नेहमीच्या प्रथेनुसार यंदाही १९ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या स्नेहसंमेलनात २०१७ ह्या वर्षात विवाहाचे सुवर्ण वर्ष गाठणाऱ्या जोडप्यांना व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना ज्ञातीतर्फे स्मृतिचिन्हे देऊन त्यांचा सत्कार करण्यात येईल. संबंधित व्यक्तींनी किंवा त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांची संपूर्ण नावे, पत्ता व टेलिफोन नंबर ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत संघाच्या पत्त्यावर पाठवून किंवा टेलिफोनवर कळवून आम्हांस उपकृत करावे.

**१ ऑक्टोबर नंतर अशी नावे आल्यास ऐनवेळी ही स्मृतिचिन्हे तयार करणे कठीण जाते याची कृपया दखल घ्यावी.**

## विजूले चुटकुले

**दोन जल्ले आय. सी. यू. त ॲडमीट जातात**

**एक जल्लॉ** : *तूं हांगा कसा आयलॉ? वकदान कीं जॉत्यान?*

**दुसरॉ जल्लॉ** : *माका पळौन एक बायल इतल्या व्हडल्यान वदरली कीं माका हार्ट ॲटॅक आयलॉ.*

---

| | | |
|---|---|---|
| **जनगणना कर्मचारी** | : | *तुमगेल्या घरांत कोण काण रावतात?* |
| **मनीस** | : | *मगेली बायल आणि दोन चोर्डां* |
| **कर्मचारी** | : | *तांगेले नांवां किते?* |
| **मनीस** | : | *कुजीले, सुजीले आणि माजीले* |
| **कर्मचारी** | : | *ही कसली नांवा?* |
| **मनीस** | : | *मगेली बायल कुसुम जीवन लेले आणि चोर्डां सुभाष जीवन लेले आणि माधव जीवन लेले* |

विजय सदानंद वागळे, ठाणे
९२२१६०७५७७

# जगावेगळे माझे विक्षिप्त चाळे

## १) कारवारच्या देवगड-दीपस्तंभाची सहल (१९५३)

हिंदू हायस्कूलमध्ये ९ वी त असताना आमच्या वर्गाची देवगडला जाण्यासाठी श्री. रामदास फेणे मास्तरांच्या देखरेखीखाली एक सहल आयोजित झाली होती. सबंध देवगड द्वीप आम्ही सर्वांनी काही तासांतच पालथे घातले. एका ठिकाणी चार-पाच फूट रुंदीची एक कपार होती व तिच्या खाचा पकडून दुसऱ्या बाजूला जाण्याचे धाडस करुन दाखविण्याचे धैर्य आमच्यात नाही असे मुलींचे ठाम मत होते आणि खरोखरच जर कपारीच्या खाच्यामधून हात किंवा पाय जर निसटला तर बॉडी मिळणे सुध्दा कठीण होते. शेवटी केवळ बरोबर आलेल्या मुलांच्या, खास करुन मुलींनी, दिलेल्या प्रोत्साहनाला बळी पडून मी या कार्याला सिध्द झालो व कपारीचा खाचा पकडून हलकेच दुसऱ्याबाजूला गेलो. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला तो ऐकून फेणेमास्तर तेथे आले. एखादी अनुचित घटना घडली असती तर सर्वांनी त्यांनाच जबाबदार धरले असते झालेला प्रकार लक्षात येताच माझ्यावर ते इतके संतापले की त्यांनी तिथल्या तिथे मला दोन शिक्षा ठोठावल्या. १) मी दीपस्तंभाजवळ सुध्दा जायचे नाही व २) सर्व चहापानाची भांडी, पेले, बश्या वगैरे मी स्वत: धुऊन कोणाचीही मदत न घेता लाँचमध्ये आणून ठेवायची. मला असे वाटते मी एकदाच असा विद्यार्थी असेन ज्याने देवगडला जाऊन सुध्दा दीपस्तंभास स्पर्शही केला नसेल.

## २) Quo Vadis आणि S.S.C. ची परीक्षा (१९५४)

S.S.C. ची परीक्षा चालू होती. मध्येच एका शनिवारी Arithmatics चा पेपर होता सकाळी १० ते दुपारी १. पेपर माझ्या दृष्टीने तसा सोपा होता. सव्वा दोन तासातच मी ८७ मार्काचा पेपर पूर्ण केला. आता फक्त १३ मार्कांचा प्रश्न सोडवणे बाकी होते. कारवारच्या शिरीन टॉकीजमध्ये दुपारी १ वाजता Quo Vadis चा शेवटचा मॅटिनी शो होता. व तो मला बघायचाच होता. परीक्षेच्या हॉलमधून १२.४५ पर्यंत मी निघणे आवश्यक होते. म्हणजे संपूर्ण सिनेमा बघायला मिळाला असता. आता माझ्यासमोर दोन पर्याय होते - एक प्रश्न १३ मार्कांचा होता, पण त्या प्रश्नाच्या यशाबद्दल मी जरा साशंक होतो. दुसरा प्रश्न दोन भागात विभागला होता. अनुक्रमे ६ व ७ मार्कांचे होते व या दोन्ही प्रश्नांच्या यशाची मला पूर्ण खात्री होती. पण वेळ थोडा जास्त लागला असता व Quo Vadis ची सुरवात थोडीशी चुकली असती. म्हणून मी १३ मार्काच्या एकाच प्रश्नाची निवड केली आणि Quo Vadis संपूर्ण पाहिला पण माझी शंका खरी ठरली. मला परीक्षेत १०० पैकी ८७ मार्क्स मिळाले. तो १३ मार्काचा प्रश्न पूर्णपणे वाया गेला होता. मी स्वत:ला खूपच दोष दिला. पण मनात एक असाही विचार आला की, असले चाळे करायला सुध्दा धमक आणि धैर्य लागतेच.

## ३) सर बिरेन मुकर्जी - मुंबई ते कलकत्ता विमानाचे तिकीट (१९६३)

सर बिरेन मुकर्जी एक फारच मोठे प्रस्थ होते. मार्टिन बर्न लि. कंपनीचे ते गव्हर्निंग डायरेक्टर होते आणि मार्टिन बर्न IISCO सकट एकूण दहा मोठमोठया कंपन्यांचे मॅनेजिंग एजंटस् होते. यावरुन सर बिरेनची भारतात काय पत होती ती कळून येईल. श्री. जवाहरलाल नेहरुंबरोबर फोनवर बोलतांना ते आपसांत एकमेकांना एकेरी नावाने संबोधित असत. वर्षातून १०-१२ वेळातरी ते मुंबईला कामानिमित्त सकाळी येत व संध्याकाळी विमानाने कलकत्त्याला परत जात. अशाच एका प्रसंगी माझ्या बॉसला त्यांनी कलकत्याचे एक रिटर्न तिकीट काढावयास सांगितले. पण एकही तिकीट शिल्लक नव्हते. सर बिरेनना तिकीट मिळत नाही हा त्यांना त्यांचा मोठा अपमान वाटला. त्यांनी ताबडतोब श्री. JRD नां फोन लावण्यास सांगितले. JRD TATA श्री. इंडियन एअरलाईन्सचे पण चेअरमन होते. पण तेही तिकीट मिळवू शकले नाहीत. कारण त्या दिवशी एक मोठा ग्रुप कलकत्त्याला जाणार होता आणि विमानातील प्रत्येक सीट त्यांनी बुक केली होती. तेव्हां JRD सुध्दा काहींच करु शकले नहीत. त्यांनी तसे सर बिरेनना सांगितले. अशा वेळी मी चुकून बोलून गेलो - Sir ! would you like me to try for the ticket? त्यांनी माझ्याकडे अशा विचित्र नजरेने बघितले, जणू माझें डोके ठिकाणावर आहे की नाही ? जिथे JRD काही करु शकले नाहीत. तिथे हा कसबेकर काय करु शकेल. पण शेवटी माझ्या बॉसच्या आग्रहामुळे मला परवानगी मिळाली. मी माता शांतादुर्गेचे मनोमनी ध्यान करत IAC च्या ऑफिसमध्ये गेलो व तेथे सबंध IAC ऑफिसच आमच्या ऑफिसला फोनवर कॉन्टॅक्ट करण्याचा प्रयत्न करत होते. पण आमचा नंबर सतत व्यस्त येत होता. मी मार्टिन बर्न मधून आल्याचे कळताच त्यांनी सुटकेचा श्वास सोडला व माझ्या हातात सर बिरेनच्या नावाने तिकीट दिले. ग्रुपमधला एक प्रवासी अचानक आजारी पडला व त्याचे रद्द झालेले ते तिकीट त्यांनी ताबडतोब सर बिरेनच्या नांवावर ट्रान्सफर केले. मी तिकीट घेऊन सरळ ऑफिसमध्ये आलो आणि सर बिरेनच्या हातात दिले. "How Could you do it Kasbekar?" मी खरी परिस्थिती त्यांना सांगिण्याइतका मूर्ख निश्चितच नव्हतो. पण काहीतरी स्वत:च्या बढाईची थाप मारणेही तितकेच घातक होते. मी फक्त एवढेच म्हणालो - "It was not so simple sir ! I had to use my charm !!"

## ४) लेडी राणू मुकर्जी आणि त्यांचे शॉपिंग (१९६५)

कधी कधी लेडी राणू मुकर्जी आपले पति सर बिरेन मुकर्जी यांचे बरोबर मुंबईला यायच्या. सर बिरेन आमच्या ऑफिसमध्ये मिटींग्स घ्यायचे व लेडी राणूजी शॉपिंग करायच्या. अशाच एका शॉपिंगच्या दौऱ्यात त्या कर्वेमार्गावरील कला निकेतन ह्या भव्य रेशमी साडयांच्या दुकानांत गेल्या होत्या व जवळ जवळ रू. ६००० ची त्यांनी खरेदी केली. १९६५ सालातली ही रु. ६००० ची खरेदी आहे हे लक्षांत ठेवा. त्यांना एक विशिष्ट साडी आवडली होती व त्यांनी त्या साडीवर रु. १०० कमी करण्यास विनंती केली पण कालानिकेतनवाल्यांनी रु. १ सुध्दा कमी करण्यास नकार दिला. म्हणून त्या रागाने ती साडी न घेताच ऑफिसमध्ये परत आल्या.

त्यांचा त्यावेळी मूड अतिशय वाईट होता. त्यांना ती साडी फारच आवडली होती पण परत तेथे जायला त्यांचा ego आड येत होता. त्या सरळ आमच्या मिटींगरुममध्ये आल्या आणि सर बिरेनवर त्यांनी तो सर्व राग काढला. त्यावेळी आमच्यापण लक्षात आले की सर बिरेनचे सुध्दा एक अनधिकृत बॉस आहेत.

मी हलकेच त्यांना म्हणालो, माझी कालनिकेतनमध्ये ओळख आहे व मी त्यांचे काम करु शकेन. त्यावेळी दुपारचे १२.३० वाजले होते. मी त्यांना हॉटेलमध्ये जाऊन लंच व विश्रांती घेऊन परत ऑफिसमध्ये येण्यास व कलानिकेतनमध्ये २.३० वाजता जाण्याचे सुचविले.

दोघेही हॉटेलमध्ये जाताच मी माझ्या बॉसना माझा प्लॅन नीट समजावून सांगितला व ऑफिसमधून रु. २०० घेतले व सरळ कलानिकेतन मध्ये गेलो. ज्याने लेडी राणूजींना सर्विस दिली होती. त्याला – त्याचे नाव लक्ष्मीचंद या कलानिकेतनच्या मालकांना भेटलो. लेडी राणूजींना आवडलेली साडीही बाजूला काढून ठेवली व बरोबर आणलेले रु. २०० मालकांना दिले व माझा प्लान त्यांना नीट समजावून सांगितला.

सुमारे ३ च्या सुमारास मी लेडी राणूजींबरोबर कलानिकेतनमध्ये गेलो. आम्हाला बघताच लक्ष्मीचंद प्लानप्रमाणे ओरडला – "अरे मॅडम आप इनको ले आये अब हमारी खटीया खड़ी होगी." मी लेडी राणूजींना सांगितले की सरळ रु. २०० कमी द्या आणि साडी घ्या. लेडी राणू मुकर्जी म्हणाल्या "नको कसबेकर, मी फक्त १०० रु. कमी करण्यास सांगितले होते."

मॅडम हा माझा प्रांत आहे please मी सांगतो तसे रु. २०० कमी द्या आणि तुमची आवडलेली साडी घ्या. सर्व व्यवहार आटोपून आम्ही ऑफिसमध्ये आलो. माझ्या हाताला धरुनच त्या सरळ मिटींग रुममध्ये घुसल्या व त्यांनी माझी एवढी तारीफ केली की सगळे – सर बिरेनसुध्दा चकीत झाले. त्यांनी नवऱ्याला सांगितले की, कसबेकर कलकत्त्याला येईल तेव्हां त्याला घरी जेवायला घेऊन या." मिटींगमध्ये श्री. ए. एन. बॅनर्जी – Liaison officer - Branches पण होते कुठल्या ब्रँचला कुठला माल देणे हे सर्वस्वी त्यांच्याच हातात होते. समोरचा प्रकार बघून आमच्या मुंबई ब्रँचला नेहमी भरपूर चांगला माल मिळायला लागला आणि टर्नओवरमध्ये मुंबई ब्रँच जी नेहमी दिल्ली ब्रँचच्या मागे दुसऱ्या नंबरावर असायची ती सरळ पहिल्या नंबरावर गेली आणि मी जोपर्यंत मुंबई ब्रँचमध्ये होतो तोपर्यंत तिने पहिला नंबर कधीच सोडला नाही.

### ५) IISCO - सर बिरेन मुकर्जी वि. रामनाथ गोयंका – प्रॉक्सी वॉर (१९६८)

१९६८ साल – IISCO च्या इतिहासातले एक अत्यंत महत्त्वपूर्ण वर्ष धरले जाते. इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे सर्वेसर्वा श्री. रामनाथ गोयंका IISCO चा पूर्ण कंट्रोल घेण्यासाठी IISCO चे शेअर्स कॉर्नर करत होते व त्यांनी सर बिरेनच्या मॅनेजमेंटला स्वत:कडे जास्ती शेअर्स

असल्याचा दावा पण केला होता. त्यामुळे एका खास मिटींगमध्ये सर बिरेनला सिध्द करणे आवश्यक होते की त्यांना श्री. गोयंकापेक्षा जास्त शेअर होल्डर्सचा पाठिंबा आहे. तद्नुसार IISCO च्या सर्व शाखांना सर बिरेनच्या मॅनेजमेंटला पाठिंबा आहे असे सिध्द करण्यासाठी शेअर होल्डर्सकडून त्यांच्या नावे Proxy घेण्याच्या कामाला लावले होते.

मी शेअर होल्डर्सची लिस्ट पाहिली आणि त्यांत मला असे आढळून आले की पेडर रोडवर रहाणाऱ्या एका गोयंका कुटुंबाकडे एक चांगला मोठा गठ्ठा शेअर्स होते . मी सरळ देवाचे ध्यान केले. व त्या गोयंका फॅमिलीकडेच Proxy घेण्यासाठी गेलो. माझ्या सहकाऱ्यांनी मला अगदी मूर्खातच काढले होते. पण मला सर्व एक गठ्ठा शेअर्सची Proxy त्या गोयंका फॅमिलीनी सर बिरेनच्या नांवाने दिली. ही गोयंका फॅमिली श्री. रामनाथ गोयंकाचेच अगदी जवळचे भाईबंद होते. पण त्यांची आपसात यादवी होती. जिथे मी स्वत:ला बाहेर फेकले जाण्याची अपेक्षा करत होतो तिथे मला भरपूर शेअर्सची Proxy मिळालीच आणि चहापण दिला गेला. मॅनेजमेंटला कळताच मला स्वत:ला ताबडतोब तो गठ्ठा घेऊन कलकत्त्याला त्याच दिवशी संध्याकाळी विमानाने बोलावणे आले. त्यांचा विश्वासच बसेना की मी गोयंका फॅमिलीकडून Proxy मिळवली आहे. गोयंका फॅमिलीकडून गोयंका विरुध्द Proxy मिळणे हाच एक मोठा चमत्कार होता.

**६ ) एक मनोगत – जे व्यक्त करण्यास तब्बल ६० वर्षे लागली ( २०१४ )**

२०१४ साली अमेरिकेला आमच्या मुलींना भेटायला गेलो होतो. तेथे हिंदू हायस्कूल मधील माझ्या वर्गातील एका मुलीची गाठ पडली. ( आम्हा दोघांचे वय अवघे ७६ वर्षे ) बरोबर तिचा नवरा व मुलेपण होती. बोलता बोलता मी तिला सहज म्हणालो की मला तिला काही सांगावयाचे आहे व ते न सांगता मला मरायचे नाही. आमचा संवाद खालील प्रमाणे झाला.

मी – खर सांगू शाळेत असताना I had lot of crush on you

ती – ( हसत हसत ) अरे मग मला सांगितले का नाही. मी तुझ्याबरोबरच लग्न केले असते.

तिचा नवरा – ( तोही हसत, हसत ) खरेच तू का सांगितले नाहीस, मी तरी सुटलो असतो.

माझी बायको – ? ? ?

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२९१३६५**

◇ ◇ ◇

## आगबोटीने केलेला कारवारचा प्रवास, जुन्या आठवणी (काळ १९५० ते १९६६)

लहानपणी 'पर्यटन' हा शब्द केवळ शब्दकोशातच पहायला मिळत असे. प्रत्यक्षात अनुभवायचा तो आजोळी जाताना केलेला प्रवास. कारवार हे माझे आजोळ. दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत न चुकता, तर दिवाळीच्या किंवा नाताळच्या ( ख्रिसमस ) सुट्टीत कधीमधी

कारवारला जाणे व्हायचेच. कितीही वेळा गेले तरी कारवारला जाण्याची उत्सुकता कधी कमी व्हायची नाही. आमच्याबरोबर माझ्या मावश्या, मामा यांचे कुटुंबीय अर्थात् सर्व मावस - मामेभावंडासकट कधीमधी पाहुणे-रावणे अशी वट्ट २०-२५ मंडळी कारवारच्या घरात मुक्कामाला जायची. इतक्या लोकसंख्येला सहज सामावून घेण्याइतके माझ्या आजोळचे घर ऐसपैस होते, तसेच सर्वांची सरबराई करण्याकरिता माझ्या आजी-आजोबांचा उत्साही देखील तिकाच दांडगा होता.

कारवारला बोटीने जाणे जास्त सुखकर असायचे. मुंबईला बोटीत चढले की थेट कारवारला उतरायचे. दुपारी ४-५ च्या सुमारास मुंबई बंदरावरुन (भाऊच्या धक्क्यावरुन) सुटलेली बोट दुसऱ्या दिवशी सकाळी ९-१० च्या सुमारास थेट कारवारला पोहोचत असे सिंदिया शिपिंग कंपनीच्या 'सरस्वती' आणि 'साबरमती' या दोन बोटी ने-आण करायच्या.

बोटीने निघायचे तर सामानाची बरीच जमवाजमव करावी लागे. कुलूपबंद पत्र्याच्या ट्रंका कपडयांनी भरलेल्या, जेवणाचा चारखणी पितळेचा डबा त्यात पुरी-भाजी, कालवलेला दही-भात अगदी चुरचुरीत फोडणी देऊन केलेला आणि तोंडी लावायला लोणचे. ही सर्व रात्रीच्या जेवणाची बेगमी, याशिवाय मुंबईहून कारवारला न्यायचे खाद्यपदार्थ मिठाई, सुतरफेणी वगैरे वगैरे. मुलांसाठी बोटीत खायला काहीतरी च्याऊम्याऊ माकडखाणे यांनी भरलेल्या बऱ्याचशा पिशव्या आणि या सर्व सामानात महत्वाची गोष्ट म्हणजे भलीमोठी सतरंजीची वळकटी. ती सर्वात जास्त महत्त्वाची. डेकवर मनाजोगती जागा दिसली रे दिसली की ती अडवायला लगेच अंथरली जायची, की सगळी मुले-बाळे तिच्यावर पसरलीच. जागा अडविणे ही फार कौशल्याची गोष्ट असे.

बोटीत स्थानापन्न झाल्यावर तासाभराने बोटीचा 'भोंगा' निनादू लागे. पोरे-टोरे घाबरुन कान बंद करुन मोठयाने रडून देत असत. या सर्व कल्लोळात बोट चालू होई. हळूं हळूं बोटीने वेग घेतला की कठडयाला टेकून फेसाळ पाणी कापत जाताना पाहून खूप मजा वाटे.

बायकांच्या गप्पा, पुरुषांचे तरुण मुलांमुलींचे पत्त्याचे डाव सुरु होत. मुले जवळपासच इकडे तिकडे धावत-बागडत नाचत खेळत असत. शाळकरी मुलांची गाणी आणि भेंडया सुरु होत.

हे सगळे सुरळीतपणे चालू असताना बोट हलायला लागली की सर्वांची तारांबळ उडत असे. त्यातून ज्यांना बोट 'लागण्याची' सवय असली की मग आजूबाजूला ऑक बॉक

आवाज येऊ लागत. त्या काळात तोंडासमोर धरायला प्लास्टीकच्या पिशव्या नसायच्या. एवादा अरुंद तोंडाचा धातूचा लोटा किंवा मग काहीच नाहीतर वर्तमानपत्राची जाड घडी. अशावेळी स्वच्छतेचे फार चोचले करणे परवडत नसे. प्रत्येक कुटुंबात कोणी ना कोणीतरी 'बोट लागणारा' मेंबर असेच. ओळख नसली तरी सहानुभूती पोटी एकमेकांच्यात आलं-लिंबाची देवाण घेवाण होत असे. हे सर्व नाटय कधी दहा-पंधरा मिनिटे तर कधी अर्धातास सुध्दा चाले. मात्र हा प्रयोग बोटीच्या प्रवासात अगदी हमखास बघायला मिळत असे. बोटीच्या प्रवासाचा तो अटळ भाग असे.

रात्री जेवण झाल्यावर झोप येईपर्यंत डेकच्या कठडयाला टेकून आकाशात चांदणे आणि खाली पासरलेला घनगंभीर, अथांग असा सागर-अंगाभोवती झणझणणारा वारा, सगळीच रुपेरी चंदेरी दुनिया हे सर्व बघता बघता पापण्या मिटायला लागल्या की या अद्‌भूत अशा स्वप्नदृश्याातून भानावर येताच सतरंजीवरच्या दुनियेत जाऊन झोप लागेपर्यंत पडून राहायचे. डास-मच्छरांचे अंगाईगीत आणि अधूनमधून छोटया-मोठया उंदराची पळापळ पहात आणि चुकचुकाट दरवळणारा अशा माहोलात देखील झोप लागायची अगदी डेकभर दरवळणारा खवट्ट खोबऱ्याच्या वासासारखा दर्प अनुभवत.

सकाळी उठून बोटीच्या कँटीनमधला चहा आणि बरोबर आणलेला खाऊ खाईपर्यंत बोट गोव्याच्या बंदरात आलेली असायची. तासभर थांबून गोव्याला उतरणाऱ्या उतारुंना पोर्तुगीज कस्टम्सच्या नाकाबंदीकडे सोडून भोंगा वाजवत पुढच्या प्रवासाला निघायची. गोव्यानंतर सुमारे दोन अडीच तासात बोट कारवारच्या परिसरात पोहोचत असे. ही बोट कारवार बंदरापासून फर्लांग दोन फर्लांग अंतरावर दूर उभी राहून भोंगा वाजवत आपण आल्याची वर्दी द्यायची. थेट बंदरापर्यंत जाण्याजोगी समुद्राच्या पाण्याची खोली नसल्यामुळे दुरुन भोंगा वाजवत राहण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हते.

तेवढया वेळात प्रवाशांनी आपले सामानसुमान, अंथरुण-पांघरुण आवरुन बंदरावरुन येणाऱ्या पडावांची वाट पाहत बसायचे. दूरवरुन वल्ही मारत चुळूक बुळूक करुन येणारे चार पाच पडावे दिसले की जय्यत तयार राहून पहिल्या फेरीत जायला मिळायची धावपळ सुरु. बायका-मुलांना तो मान अगोदर मिळायचा. अर्थात वडीलधाऱ्यांना सुध्दा. डेकवरुन खाली लोंबकळणाऱ्या शिडया खाली सोडल्या की त्याखाली पडाव येऊन थांबायचे. पाण्यात वर-खाली, खाली-वर तरंगणाऱ्या पडावांतून आलेले हमाल भराभर बोटीत चढून प्रवाशांचे सामान खाली आणून पडावात व्यवस्थित रचून ठेवीत. नंतर अगोदर उतरणाऱ्या बायका पोरांना आणि वयस्कर लोकांना पडावातून नावाडी आणि हमाल हात देऊन सुरक्षितपणे

पडावात घेत असत. एरवी शिडीवरुन पाण्यात डुचमळणाऱ्या पडावात उतरणे म्हणजे एक प्रकारची कसरतच असायची. या गडबडीत कधी कोणाच्या हातातली बारीक सारीक वस्तू निसटून पाण्यात पडायची, तर कुणाच्या डोक्यावरची हॅट नाहीतर टोपी. मग ती समुद्रार्पण झाल्यावर थोडा आरडाओरडा, चडफडाट आणि पोराबाळांची करमणूक. वस्तू पाण्यात पडल्या तरी माणसे मात्र सुखरुपपणे पडावातल्या फळकुटावर येऊन बसायची. मग वाऱ्याच्या वेगाला अनुसरुन चूळूकबूळूक करीत पडाव बंदराला लागायचे.

मग आपापले सामान ताब्यात घेऊन एवाद दुसरी टॅक्सी (तेव्हा भल्यामोठया 'डॉज' (Dodge) किंवा 'स्टेशनवॅगन' असायच्या) किंवा सर्विस बस उभी असलेली पाहून तीमध्ये सामानासकट शिरायची कसरत.

मुंबईहून आलेली आमची एक बॅच कमीतकमी ७-८ जणांची तरी असायची. बस आमच्या घराच्या जवळपास थांबत नसे. घर मुख्य रस्त्यापासून आत होते. त्यामुळे टॅक्सीच्या निदान दोन फेऱ्या केल्यावाचून इलाज नसायचा. घरी पोहोचेपर्यंत सकाळचे अकरा-साडेअकरा वाजून गेलेले म्हणजे ही वेळ धड नाही पेजेची, धड नाही दुपारच्या जेवणाची. मग कोळशाची 'धुवण' दिलेले, आताच्या शब्दात 'स्मोक' (Smoke) दिलेले गरम मसाल्याचे पोहे किंवा तिखट-मिठाचा सांजा असा त्यामानाने पोटाला हलका असा फराळ करुन आंघोळीची लगबग सुरु होई.

असा आमचा मुंबई-कारवार प्रवास 'सरस्वती' किंवा 'साबरमती' नामे बोटीने आणि 'सिंदिया' कंपनीच्या कृपेने सुफळ आणि संपन्न होत असे.

**शैलजा मंगेश नाडकर्णी, शिवाजी पार्क**
**२४४४५६४५**

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| अक्षय सुनील नाडकर्णी, माहीम | व | अपूर्वा अनिल नाईक, कुर्ला |
| ओंकार अजित नाडकर्णी, दहिसर | व | कृत्तिका संजय पालेकर, ठाणे |
| स्नेहा श्रीहर्ष फेणे, शिवाजीपार्क | व | आनंदध्रुब फिटकारीवाला, मुंबई |
| सुनील गोविंद (अरुण) वर्टी, बोरीवली | व | शलाका गजानन (अरुण) ब्रह्मे, माहीम |
| श्रुती राजन वागळे, ग्रॅंटरोड | व | सुनील परशुराम तेंडूलकर , पुणे |

# श्री मंगेशाची आरती

जयदेव जयदेव जय जय मंगेशा।
सुखदात्या कुलदेवा जय मांगिरीशा।। धृ।।
प्रेमळ लोमेशशर्मा भक्तांचा त्राता।
सन्मुख श्रीपुरुषोत्तमा बहुभाग्यदाता।।
सान्निध्यी शिवशर्मा संसारी नेता।
स्वकुलास्तव गोमांतकि वससी भवनाथा।।१।।
शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना।
महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना।।
सदया महालसाही रक्षी सकलांना।
दिव्य अशा शक्ती या प्रकटल्या नाना।।२।।
वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायी।
निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं।
रुद्रस्वरूप शिवमय शंकर सुखदायी।
प्रगटुनियां भक्तांते पावसि लवलाही।।३।।
मुलकेश्वर संकटी धांवत ये वेगें।
साह्य करी भक्तां जे पिडिले भवरोगें।।
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे।
नित्य करी संरक्षण राहुनियां मागे।।४।।
जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते।
जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते।।
जय जय लोमशशर्मा जय दे आम्हांते।
मुलकेश्वर मंगेशा रक्षीं बाळां तें।।५।।
सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा।
बाळावरि करुणाघन प्रेमे वर्षावा।।
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा।
अर्पी वामन पायी निष्काम सेवा।।६।।

श्री मंगेश माहात्म्य श्री मंगेश माहात्म्य

श्री मंगेश माहात्म्य श्री मंगेश माहात्म्य

बहुतेक आरतीसंग्रहामध्यें गणपती, शंकर, श्रीदेवी, दत्तात्रय, मारुती, विठ्ठल, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या आरत्या जास्त प्रचलित आहेत. आपल्या बहुतेकांचा कुलदेव म्हणजे श्रीमंगेश पण श्रीमंगेशाची आरती प्रचलितांमध्ये नाही. ही उणीव भरुन काढण्याचा हा प्रयत्न. ही आरती प्रकांड पंडित श्री. वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी यांनी रचली होती. ती कोणत्या संग्रहात प्रसिध्द झालेली याची माहिती नाही.

(प्रायोजन सौजन्य : किरण दुभाषी)




SIP in Mutual Funds will help you to save regularly & discipline manner,
To achieve your goal..

| Monthly Investment required for target of Rs.1 Crore | | | |
|---|---|---|---|
| **No. of Years** | **CAGR Returns** | | |
| | **12%** | **15%** | **18%** |
| 10 | Rs. 43,471/- | Rs. 36,335/- | Rs. 29,739/- |
| 15 | Rs. 20,017/- | Rs. 14,959/- | Rs. 10,879/- |
| 20 | Rs. 10,109/- | Rs. 6,679/- | Rs. 4,267/- |
| 25 | Rs. 5,322/- | Rs. 3,083/- | Rs. 1,717/- |

## Mangsidesh Investments Pvt Ltd.

Head Office : 402, Business Point Bldg, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West)
Tel No. 022 - 4233 2323/ 6584 1233/ 6523 8964
Branch Office : A/53, Shanti Shopping Centre, Next to ICICI ATM, MiraRoad 401 107
Tel No. +91 91672 20380 / 022 - 2855 2111/ 2812 7555
1/11, Kappeesh Tower, M.G. Road, Mulund (West), Mumbai 400 080
Tel No. + 91672 20379/ 022 - 6500 1366

Mutual Fund Investments are subject to market risks, Read all schemes related documents carefully.

## प्रतिक्रिया

## 'जय जय गौरी शंकर' या नाटकाचे वाचन श्रीमंगेश देवस्थानांत

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत सौ. नीलिमा नाडकर्णी यांचा 'शाल्मली झणकर हिच्या कत्थक नृत्यशैलीची सेवा श्री शान्तादुर्गेच्या चरणी' हा एक हृद्य लेख वाचनांत आला. त्या संदर्भात मलाही अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका हृद्य घटनेचे स्मरण झाले.

विद्याधर गोखले लिखित 'जय जय गौरी शंकर' या तुफान गाजलेल्या नाटकाच्या वाचनाचा मुहूर्त ललित कलादर्शचे भालचंद्र पेंढारकर यांचे पुत्र ज्ञानेश या तेव्हांच्या शाळकरी मुलाच्या हस्ते झाला ते कुठे तर खुद्द श्रीमंगेश देवस्थानांत! ही अत्यंत संस्मरणीय घटना होय. श्री मंगेश व श्री शान्तादुर्गा या देवतांवरील कथेवर आधारित असलेल्या या नाटकांत शंकर व पार्वती यांचे नाटय सुरेखपणे गुंफले आहे. या नाटकाच्या शुभारंभाचा प्रयोग १४ ऑगस्ट १९६६ रोजी ललित कलादर्श या संस्थेतर्फे बिर्ला मातुश्री सभागृहांत रसिकांच्या प्रचंड उपस्थितीत पार पडला. भालचंद्र पेंढारकर याशिवाय या नाटकांत पंडित राम मराठे, प्रसाद सावकार या दिग्गज कलाकारांनी काम केले होते. कारवारकरांना अभिमान वाटावा म्हणजे तिथल्याच मातीतल्या जयश्री शेजवाडकर यांचेही या नाटकांत भिल्लीणीचे काम होते. त्यांनी गायलेले 'सावन माझं गवसलं' हे गाणे त्यावेळी अत्यंत लोकप्रिय झाले होते.

या सदाबहार नाटकाचा पहिला प्रयोग होऊन आता पन्नास वर्षे झाली. त्याचे एकंदर २२५० हून अधिक प्रयोग झाले आहेत. विद्याधर गोखले यांच्या सुविद्य कन्या शुभदा दादरकर व ज्ञानेश पेढारकर सध्या या नाटकांतील गाजलेल्या गाण्यांचा उदयोन्मुख कलाकरांना सोबत घेऊन एक विशेष संगीत कार्यक्रम उत्तम निरुपणासह सादर करतात. या निरुपणांत श्री मंगेश देवस्थानांतील वाचनाच्या मुहूर्ताचा आवर्जून उल्लेख केला जातो.

**द. ना. नाडकर्णी, पारले.**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## दिवंगत श्री. अशोक सदाशिव कुलकर्णी यांना भावपूर्ण श्रध्दांजली



जन्म : ९ जाने. १९४६
मत्यू : १५ फेब्रु. २०१७

स्व. अशोक सदाशिव कुलकर्णी हे माझे फक्त पती नसून माझे खरे मित्र होते. अत्यंत शांत स्वभाव आणि मृदुभाषी, प्रेमळ आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे होते. काम आणि जबाबदारीचे प्रचंड दडपण असूनही कोणीहि त्यांना चिडलेले पाहिले नाही. निर्व्यसनी आल्यामुळेच त्यांच्या विचारांचा समतोलपणा कधीहि ढासळला नाही.

दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी कर्क रोगाच्या आजाराने वयाच्या ७१ व्या वर्षी बोरीवली येथील करुणा रुग्णालयात त्यांचे दु:खद निधन झाले. गेली दोन वर्षे ते कर्क रोगाशी झुंज देत होते, जगण्याची शक्ति त्यांना आणखी काही काळ साथ देईल असे वाटत होते. परंतु नियतीला ते मान्य नव्हते हेच खरे. अखेरीस दि. १५ फेब्रुवारी २०१७ रोजी सकाळी ७.१५ वाजता त्यांनी शेवटचा श्वास सोडला.

त्यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी तसेंच शिस्तप्रिय जीवन नेहमीच सर्वांच्या मनात घर करुन राहील. आपले विचार आणि शिस्त त्यांनी कुणावरही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे लादली नाही. तसेच माझ्यावरही त्यांनी कोणत्याही प्रकारचे बंधन लादले नाही. आमच्या वैवाहिक जीवनात ते एक आदर्श पती, सच्चा प्रेमी, माझे जीवलग मित्र आणि आदर्श गुरु म्हणून जीवन जगले. संध्याछायेच्या माझ्या उर्वरीत आयुष्यात केवळ त्यांच्या आठवणींच्या छायेतच मी जगणार आहे.

**ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो !**

**श्रीमती शोभा अशोक कुलकर्णी, अंधेरी**


**COMPUTER | LAPTOP SALES & SERVICE**

**TOTAL SOLUTIONS TO :**



- Windows Formatting
- Installation of Anti-Virus
- Power Supply SMPS Problems
- Overheating of laptops etc.



MR. ABHAY TALMAKI

**8080151572 / 7021201371** abhaytalmaki@gmail.com

## निधन

| | | |
|---|---|---|
| सरिता अनंत बोरकर | (कोडीबाग) | पारले |
| बाळकृष्ण यशवंत (पांडुरंग) भेडसगांवकर | (शिरसी) | पुणे |
| गिरीश महाबळेश्वर देसाई | (हन्नळ्ळी) | गोरेगांव |
| गजानन दुर्गाराव गायतोंडे | (हळगे) | माहीम |
| उमेश नारायण हिचकड | (अंकोला) | अंकोला |
| शांताराम मारुति कसबेकर | (खारगे) | कोपरखेरणे |
| महेश्वर (अतुल) वामन कसबेकर | (कडवाड) | दादर |
| वत्सला (मीरा) महाबळेश्वर कुलकर्णी | (किन्नर) | ठाणे |
| हेमा रमाकांत मुझुमदार | (अंकोला) | बंगळूर |
| मंगला प्रेमानंद मुझुमदार | (अंकोला) | दादर |
| अशोक काशिनाथ नाडकर्णी | (मल्लापूर) | गोरेगांव |
| मोहन विश्वेश्वर नाडकर्णी | (मल्लापूर) | मुलुंड |
| हेमानंद (मोहन) वासुदेव नाडकर्णी | (अंकोला) | अंधेरी |
| मंगला प्रकाश नाडकर्णी | (अंकोला) | माहीम |
| राजेंद्र (जयंत) शंकर नाडकर्णी | (सांवरपै) | दहिसर |
| ऊर्मिला अमरीश पुरी | | |
| (पूर्वाश्रमीच्या ऊर्मिला यशवंत (जॉगडॉ) दिवेकर) | (केरवडी) | जुहु |
| बाळकृष्ण गोविंद शहापूरकर | (कारवार) | कारवार |
| शशिकांत विश्वनाथ तेलंग | (बाड) | डोंबिवली |
| प्रभाकर काशिनाथ तेलंग | (केरवडी) | ठाणे |
| सदानंद शांताराम वागळे | (अस्नोटी) | चेम्बूर |
| मालिनी मनोहर वागळे | (माजाळी) | माहीम |
| सिध्दानंद विश्वनाथ वागळे | (माजाळी) | माहीम |
| *ज्योत्स्ना (पूर्णा) दुर्गादास वागळे | (माजाळी) | खार |
| नलिनी रमाकांत वागळे | (माजाळी) | डोंबिवली |
| शिवानंद शामराव वागळे | (माजाळी) | अंधेरी |
| **उषा प्रभाकर वागळे | | |
| (पूर्वाश्रमीच्या उषा रामराव नाडकर्णी) | (बसुणगे) | पारले |

*पूर्णा वागळे यांनी देहदान केलेले आहे.

** गेल्या अंकातील नांवाची दुरुस्ती

## कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धा

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही संघाच्या विद्यमाने संस्कृत पाठांतर स्पर्धा आयोजिण्यात येत आहे. नेहमीप्रमाणे यंदाही स्पर्धकांसाठी दोन गट पाडलेले आहेत. पण शिशुगटातील कुठल्याही स्पर्धकास कुमारगटातही भाग घेण्यास मुभा आहे. प्रत्येक गटासाठी तीन पारितोषिके आहेत. स्पर्धेची पूर्व तयारी करण्यासाठी स्पर्धकांनी लवकरांत लवकर पण बुधवार दिनांक ६ सप्टेंबर पर्यंत आपली नांवे पत्राने अथवा फोनवर ( २३८७७३०१ ) श्रीमती भांडारकर यांच्याकडे नोंदवावी व थेट स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

**स्पर्धेची वेळ :** रविवार १७ सप्टेंबर २०१७, सायंकाळी ४.३०

**स्पर्धेचे स्थळ :** दामले योग केन्द्र, लोकमान्य नगर सभागृहाच्या उत्तरेच्या बाजूने, मनमाला टँक रोड (सावंत मार्ग), माहीम.

**विशेष सूचना :** स्पर्धेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यास ही स्पर्धा स्थगित करण्यात येईल व इच्छुक स्पर्धकांना तसे कळविण्यात येईल. त्यांनीही कार्यालयात १४ वा १५ सप्टेंबर रोजी संपर्क साधावा.

**१. शिशुगट : इयत्ता ४ थी पर्यंत**

**पर्याय क्र. १ : अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम्।**
**उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम्।।१।।**
**अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा।**
**पंचकं ना स्मरेन्नित्यं महापातक नाशनम्।।२।।**
**अयोध्या मथुरा माया काशी कांची अवंतिका।**
**पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः ।।३।।**
**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते।।४।।**

**पर्याय क्र. २ : भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती।।**
**तस्माद्धि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ।।१।।**
**पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम्।**
**मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते।।२।।**
**सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया।**
**मनो न भिद्यते यस्य स योगी ह्यथवा पशुः।।३।।**
**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुर्साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।४।।**

## २. कुमार गट : इयत्ता ५ ते १०

पर्याय क्र. १ : आरभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः।
प्रारभ्य विघ्नविहता विरमंति मध्याः।।
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः।
प्रारभ्य चोत्तमजना न परित्यजन्ति।।१।।
येषां न विद्या न तपो नं दानं।
ज्ञानं न शीलम् न गुणो न धर्मः।
ते मृत्युलोके भुवि भारभूता।
मनुष्यरूपेण मृगश्चरन्ति।।२।।
दानेन पाणिर्न तु कङ्कणेन।
स्नानेन शुध्दिर्न तु चन्दनेन।
मानेन तृप्तिर्न तु भोजनेन ज्ञानेन मुक्तिर्न तु मुण्डनेन।।३।।

पर्याय क्र. २ : रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः।।
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहम्।
रामेचित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर।।
आदौ रामतपोवनाधि गमनं हत्वां मृगं कांचनम्।
वैदेहीहरणं जटायुमरणं सुग्रीव संभाषणम्।।
वालीनिर्दलनं समुद्रतरणं लंकापुरीदाहनम्।
पश्चाद्रावण कुम्भकर्ण हननं एतद्धि रामायणम्।।


### श्रद्धांजली

**कै. सावित्रीबाई (कावेरी) नागेश नाडकर्णी (सांवरपै)**


३२ वे पुण्यस्मरण – निधन : रविवार २८ जुलै १९८५

तुझ्या प्रेमळ आठवणीशिवाय गेल्या ३२ वर्षांत एकही दिवस गेला नाही. श्रीमंगेश तुझ्या आत्म्यास शांती देवो. तुझा आशीर्वाद आमच्या पाठीशी अखंड राहो. तुझ्या स्मृतीस सादर प्रणाम.

**कै. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी, यांच्या इच्छेनुसार बंधू दत्तात्रयतर्फे**

www.kccgoa.in

# कोमल हिरवी तृणपाती ही
# अलगद झुलवी सर्वांग,
# कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
# उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

**प्रॉजेक्ट मान्यता:** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्य:** नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मन:शांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
## कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

**मुंबई ऑफिस:** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:**2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321
गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्रीमती इंदिरा व श्री. श्रीपाद वागळे यांच्या इच्छापत्रानुसार एज्युकेशन सोसायटीला चार लाख रुपयांची देणगी

मूळ अस्नोटी गांवचे पुणे येथे स्थायिक झालेले श्री. श्रीपाद सदाशिव वागळे यांचे १९९५ साली निधन झाले होते. तर त्यांच्या पत्नी श्रीमती इंदिरा २०११ साली निवर्तल्या. त्यांच्या इच्छापत्राची कायदेशीर पूर्तता अलीकडेच झाली. त्यानुसार अलीकडेच एज्युकेशन सोसायटीला चार लाख रुपयांची देणगी मिळाली आहे.

### ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला आणखी दोन लाख रुपयांची देणगी

पुणे येथील ॲडमिरल जयंत गणपत नाडकर्णी हे मूळचे अगळी या गांवचे असल्याने त्यांच्याविषयी ज्ञातिबांधवानांच नव्हे तर समस्त कारवारकरांना अभिमान आहे. स्थानिक समाजात ते कारवारभूषण आहेत. त्यांना ज्ञातीबद्दल विशेष जिव्हाळा. २०१६–२०१७ हे वर्ष म्हणजे आपल्या बँकेची शताब्दी. ते साजरे करण्यासाठी ठिकठिकाणी महोत्सव साजरे केले जात आहेत. ११ मार्च २०१७ रोजी पुणे येथे समारंभ झाला. त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे आमंत्रण त्यांनी आनंदाने स्वीकारले. त्यांची कर्तबगार मेहुणी कु. लीला यशवंत दिवेकर यांचे दोन वषापूर्वी निधन झाले तेव्हा त्यांच्या कर्तृत्वाविषयी ॲडमिरल नाडकर्णी यांनी मुखपत्रिकेसाठी एक खास लेख लिहिला होता. त्यावरुन त्यांची ज्ञातीविषयीची आपुलकी सिध्द होते. त्यांच्या विवाहाच्या सुवर्णवर्षदिनाच्या प्रसंगी त्यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली होती त्याशिवाय वडील बंधू श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी, आई श्रीमती कृष्णाबाई व सासू श्रीमती रमाबाई यशवंत दिवेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थही त्यांनी एज्युकेशन सोसायटीला देणग्या दिलेल्या आहेत. त्यांच्या पत्नी श्रीमती विमल यांचे गेल्यावर्षी निधन झाले. पत्नीच्या स्मरणार्थ ॲड. नाडकर्णी यांनी एज्युकेशन सोसायटीला आणखी दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री. देवीदास कसबेकर यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी ५०,००१ रुपयांची देणगी

संघाचे एक आधारस्तंभ श्री. देवीदास देवराव कसबेकर यांचे गेल्या वर्षी मे महिन्यांत दु:खद निधन झाले होते त्यासंबंधीचे एक वृत्त जुलै २०१६ च्या मुखपत्रिकेच्या अंकात छापण्यांत आले होते. अलीकडेच त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती लता यांनी पतीच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी ५०,००१ रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ८ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| २. | श्री. सच्चिदानंद नागेश नाडकर्णी यांच्या २१ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या नाती कुमारी सुदिप्ता व कुमारी अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ३. | श्री. महाबळेश्वर (विनू) वैकुंठ नाडकर्णी (सांवर पै – सदाशिवगड) यांच्या स्मरणार्थ नातू श्री. अजित अशोक नाडकर्णी यांजकडून | १,००० |
| ४. | श्रीमती नीना (सुमन) दिगंबर कसबेकर यांच्या १६ व्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. दिगंबर मारुति कसबेकर व कन्या श्रीमती संध्या व श्रीमती सुजाता यांजकडून. | १,००१ |
| ५. | सविता सबनीस फाऊंडेशनतर्फे खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस | २,५५१ |
| | श्रीमती सविता किशोर सबनीस | २,५५१ |
| ६. | हितचिंतकाकडून | ३,००० |
| ७. | श्रीमती गंगाबाई व श्री. काशिनाथ त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ नाडकर्णी कुटुंबीयाकडून | २,००१ |
| ८. | हितचिंकाकडून | १२,००० |
| ९. | विवाहाच्या सुवर्णजयंती निमित्त श्रीमती वृंदा व श्री. अरविंद भालचंद्र दिवेकर यांजकडून | १०,००० |
| १०. | श्री. शिवानंद बाळकृष्ण पालेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. विठ्ठल (बाळ) व स्नुषा श्रीमती लता पालेकर यांजकडून. | १०,००० |
| ११. | श्री. मोहन विश्वेश्वर नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती स्मिता उदय वाघ यांजकडून. | १,००१ |
| १२. | श्रीमती इंदूमती सदानंद नाडकर्णी यांच्या ८५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ | ५,००० |

## वृध्दसेवानिधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शांता (माई) व श्री. मंगेश महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वर्षदिन प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे यांजकडून | ११,००० |
| २. | श्री. सुबोध मंगेश मुळगावकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती सुषमा यांजकडून. | २५,००० |
| ३. | श्री. देवीदास देवराव कसबेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती लता यांजकडून. | ५०,००१ |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्रीमती विनता विश्वंभर गायतोंडे यांच्या १६ व्या पुण्यतिथीनिमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून. | १०,००० |
| ५. | श्री. उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या ३० व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| ६. | श्री. मधुकर वेंकटराव नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून. | २,००१ |
| ७. | श्री. किशोर दत्तात्रय बोरकर यांजकडून आई श्रीमती उमाबाई (कुन्ना) | |
| | दत्तात्रय बोरकर यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ | १०,००० |
| | पत्नी कुंदा यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी | १०,००० |
| ८. | श्रीमती उषा मोहन दिवेकर यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती वंदना गिरीश वाघ यांजकडून. | २५,००० |
| ९. | श्रीमती रुक्माबाई (माणक) विनायक गायतोंडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पुत्र श्री. कृष्ण (अशोक) यांजकडून. | २५,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शांताबाई (चंपूताई) रमाकांत बोरकर यांच्या ८ व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| २. | श्री. महाबळेश्वर (विनू) वैकुंठ नाडकर्णी (सांवरपै सदाशिवगड) यांच्या स्मरणार्थ नातू श्री. अजित अशोक नाडकर्णी यांजकडून. | १,००० |
| ३. | श्री. दीपक देवीदास कुलकर्णी यांजकडून | २,५०० |
| ४. | श्रीमती ललिता माधव वागळे यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून. | १०,००० |
| ५. | श्रीमती इंदिरा व श्री. श्रीपाद सदाशिव वागळे यांच्या इच्छेनुसार दि महाराष्ट्र एक्झीक्युटर व ट्रस्टी यांजतर्फे | ४००,००० |
| ६. | श्री. माधव दत्तात्रय वर्टी यांच्या ९ व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती माधुरी यांजकडून. | १,००१ |
| ७. | प्रिय पत्नी श्रीमती विमल जयंत नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी पत्नी ॲडमिरल (निवृत्त) जयंत गणपत नाडकर्णी यांजकडून | २००,००० |
| ८. | श्रीमती सुनीती सुरेश शहापूरकर यांच्या ३ ऱ्या पुण्यतिथी निमित्त बंधू श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून. | १०,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. उपर्णा सदानंद देसाई, ठाणे | ५,००० |

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.